# स्थायी समिती
## दाखल विषय – दि. २४/८/२०१६

**विषय क्रमांक :– १०९० त्वर्य**

कार्यकारी अभियंता क्र. ४ पथ विभाग यांच्या कार्यक्षेत्रातील नगररोड, वडगांवशेरी क्षेत्रिय कार्यालय मध्ये रिसर्फेसिंग व तदनुषंगिक कामे करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ५ टेंडर्सपैकी ठेकेदार मे.एस.के.येवले ॲण्ड कंपनी यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु. ६,०४,०३,१८३/– पेक्षा १६.४८% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु.५,०४,४८,७३८=४४ पर्यंत काम करून घेणेस अधिक टेंडर अटीशर्तीतील भाववाढ व विशेष भाववाढ सुत्रानुसार फरक अदा करणेस/कपात करणेस व करार करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे जा.क्र. मआ/पथ/४२९ दि. २०/८/२०१६ चे पत्र.

**विषय क्रमांक :– १०९१ त्वर्य**

पुणे सोमेश्वरवाडी नाल्यालगत पाषाण स.नं. २० येथील प्ले–ग्राऊंडवर बॅडमिंटन हॉल, टेबल टेनिस हॉल व लॉन टेनिस ग्राऊंड ताबा दिनांकापासून ३ वर्षे कालावधीसाठी भाडेतत्वावर चालविणेस देणेसाठी निविदा मागविण्यात आल्या असता एकूण ३ निविदा प्राप्त झाल्या असून सर्वात जास्त दर देणारे अ.क्र. १ चे निविदाधारक सोमेश्वर फाउंडेशन, ४४६ गोपी भवन, हॉटेल शैलेजा लेन, जंगली महाराज रोड, शिवाजीनगर, पुणे ०५ यांनी देऊ केलेली मासिक रक्कम रूपये ३०,५५५/–ही मनपा निर्धारीत मासिक रक्कम रूपये २५,५५०/– पेक्षा रक्कम रूपये ५,००५/– ने जास्त असल्याने त्यांनी देऊ केलेली मासिक र.रुपये ३०,५५५/– प्रमाणे आणि शासकीय नियमानुसार प्रतिवर्षी मक्ता रक्कमेवर सेवाकर प्रचलित दराने भरुन घेणेस ताबा दिनांकापासून ३ वर्षे कालावधीसाठी टेंडर अटी व शर्तीप्रमाणे मक्ता पध्दतीने देणेस व महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ७९ आणि मिळकत वाटप नियमावली २००८ मधील तरतुदीनुसार त्यांचेबरोबर करारनामा करणेस मा.स्थायी समितीमार्फत मा.मुख्य सभेची मान्यता मिळणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र.मआ/माव्य/४३० दि.२०/८/२०१६ चे पत्र.

**विषय क्रमांक :– १०९२ त्वर्य**

पुणे मेट्रो रेल प्रकल्पाच्या वनाज ते रामवाडी या मार्गिकेसाठी **"एन्व्हार्यमेंट इम्पॅक्ट –ॲसेसमेंट"** रिपोर्ट तयार करणेसाठी डॉ. एस.के.जैन, सेंटर फॉर एन्व्हार्यमेंट रिसर्च व डेव्हलपमेंट नोएडा, न्यू दिल्ली यांची नेमणूक करणेस व या कामाची फी अदा करण्यासाठी खालील बाबीस मान्यता मिळणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/प्रकल्प/४३५ दि. २२/८/२०१६ चे पत्र.

१) **"वनाज ते रामवाडी"** या मेट्रो मार्गिकेसाठी Environment Impact Assessment रिपोर्ट मा.महा.आयुक्त यांच्या विषयपत्रामध्ये नमुद केलेल्या संदर्भ क्र. २ च्या पत्रात नमुद स्कोप ऑफ वर्क प्रमाणे डॉ. एस.के.जैन, सेंटर फॉर एनव्हार्यमेंट रिसर्च ॲन्ड डेव्हलपमेंट नोएडा, न्यू दिल्ली यांचेकडून रिपोर्ट तयार करण्यासाठी त्यांची या कामापुरती नेमणूक करणेस, त्यांचेकडून अहवाल तयार करून घेणेस.

२) सदर अहवाल पुणे महापालिकेस सादर केल्यानंतर मा.महा.आयुक्त यांच्या विषयपत्रामध्ये नमुद केलेल्या संदर्भ क्र. २ च्या पत्रात नमुद फी र.रू. ३,२५,०००/– (अक्षरी रक्कम रू. तीन लाख पंचवीस हजार फक्त) अधिक शासनाच्या नियमाप्रमाणे सर्व्हीस टॅक्स @ १२.३६% डॉ. एस. के. जैन, सेंटर फॉर एन्व्हार्यमेंट रिसर्च ॲन्ड डेव्हलपमेंट यांना अदा करणेस.

३) तसेच या कामाच्या बैठकीसाठी कोर्टाच्या तारखेला पुणे येथे हजर रहाण्यासाठी होणारा पुणे ते दिल्ली जाण्या–येण्याचा विमान प्रवास खर्च, लोकल ट्रॅव्हल्स खर्च व पुणे येथील निवासाचा, जेवणाचा (Boarding & Lodging) प्रत्यक्ष होणारा खर्च पुणे महापालिकेने डॉ. एस.के.जैन, सेंटर फॉर एन्व्हार्यमेंट रिसर्च ॲन्ड डेव्हलपमेंट यांना कमी कालावधीत काम पूर्ण करावयाचे असल्याने कामाचे टेंडर/कोटेशन न मागविता, करारनामा न करता, अनामत रक्कम भरून न घेता अदा करण्यास, मेट्रो सेल अर्थ तरतुदीवर त्यांचे बील खर्ची टाकण्यास, वर्कऑर्डर/लेटर ऑफ ॲक्सेप्टंन्स देण्यास विशेष बाब म्हणून मान्यता देण्यास.

**विषय क्रमांक :– १०९३ त्वर्य**

प्रभाग क्र. २९ ब मध्ये बावधन खुर्द स.नं. २२/१ ते ४/४ याठिकाणी माध्यमिक शाळेसाठी आरक्षित जागेवर शाळेचे बांधकाम करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ४ टेंडर्सपैकी ठेकेदार मदन एन्टरप्रायझेस यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु.५३,०५,८३१/– पेक्षा २१.५५% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु. ४१,६२,४२४=४१ पर्यंत काम करून घेणेस अधिक निविदा अटी शर्तीतील बाजार भाववाढ सुत्र व विशेष भाववाढ सुत्रांनुसार फरक अदा/कपात करणेस व त्यापोटी त्यांचेशी करारनामा करणेस मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(इ) यांचे जा.क्र. मआ/भवन/४३७ दि. २२/८/२०१६ चे पत्र.

**विषय क्रमांक :– १०९४ त्वर्य**

प्रभाग क्र. ६१ अ मध्ये खालील विविध विकास कामे करणेसाठी र.रु. ६५ लाखाचे खालीलप्रमाणे वर्गीकरण करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.सौ.नंदा लोणकर यांचे दि. २७/६/२०१६ चे पत्रावर झालेला मा.स्थायी समिती ठराव क्र. ६१५ दि. ५/७/२०१६ ला अनुसरुन मा.अति.महा.आयुक्त(वि) यांनी जा.क्र. मआ/सहमआपरि.४/४४४ दि. २३/८/२०१६ ने पाठविलेला अभिप्राय विचारासाठी.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २०१६-२०१७ चे अंदाजपत्रक,<br>१) ४. झोपडपट्टी निर्मुलन व पुनर्वसन निधीतून करावयाची कामे, पान क्र. १३८, अ.क्र. ३, सुलभ पध्दतीची शौचालये बांधणे, (यादी क्र.एसजी २), पान क्र. २५४, अ.क्र. ५५, प्रभाग क्र.६१अ, मध्ये सिद्धार्थनगर परिसरामध्ये शौचालय बांधणे. | २५ लाख | --- |
| क. अंदाजपत्रक, २.गटारे व नाले, पान क्र. १८, मलनि:सारण विभागाकडील देखभाल दुरुस्तीची कामे (यादी क्र. एसएक्स २),<br>२)पान क्र.३३, अ.क्र.१३७, प्रभाग क्र.६१अ, मध्ये सिद्धार्थनगर येथील ड्रेनेज लाईन साफ-सफाई करून चेंबर मधील गाळ काढणे. | २० लाख | --- |
| ३) पान क्र.३३, अ.क्र.१३८, प्रभाग क्र.६१अ मध्ये साळुंके विहार रोड व इंदिरानगर झोपडपट्टी येथील ड्रेनेज लाईन साफ-सफाई करणे व तदनुषंगिक कामे करणे. | २० लाख | --- |
| <u>**नवीन सुचविलेली कामे**</u> | | |
| १) प्रभाग क्र.६१अ, मधील विविध शौचालय दुरूस्ती करणे. | --- | १० लाख |
| २) प्रभाग क्र.६१अ, मधील म.न.पा. शाळेमध्ये विकास कामे करणे. | --- | १० लाख |
| ३) प्रभाग क्र.६१अ, मध्ये थर्मोप्लास्टिक पेंट व ट्राफिक विषयक कामे करणे. | --- | १० लाख |
| ४) प्रभाग क्र.६१अ, मध्ये विविध सुशोभिकरण व सुधारणा कामे करणे. | --- | १० लाख |
| ५) प्रभाग क्र.६१अ, मध्ये विविध पर्यावरण संदेश विषयक कामे करणे. | --- | १० लाख |
| ६) प्रभाग क्र.६१अ, मध्ये विविध ठिकाणी रेट्रोरिफ्लेकटर बसविणे. | --- | १० लाख |
| ७) प्रभाग क्र.६१अ, एन आय बी एम परिसरात सुशोभिकरणाची कामे करणे. | --- | ५ लाख |

**विषय क्रमांक :– १०९५ त्वर्य**

रक्कम रू. २१ कोटी १२ महिने मुदतीसाठी गुंतवणूक करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(ज) यांचे जा.क्र. मआ/मुलेविअ/४४५ दि. २३/८/२०१६ चे पत्र.

**विषय क्रमांक :– १०९६ त्वर्य**

रक्कम रू. २१ कोटी १२ महिने मुदतीसाठी गुंतवणूक करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(ज) यांचे जा.क्र. मआ/मुलेविअ/४४६ दि. २३/८/२०१६ चे पत्र.

**विषय क्रमांक :– १०९७ त्वर्य**

रक्कम रू. २१ कोटी १२ महिने मुदतीसाठी गुंतवणूक करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(ज) यांचे जा.क्र. मआ/मुलेविअ/४४७ दि. २३/८/२०१६ चे पत्र.

**विषय क्रमांक :– १०९८ त्वर्य**

रक्कम रू. २१ कोटी १२ महिने मुदतीसाठी गुंतवणूक करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(ज) यांचे जा.क्र. मआ/मुलेविअ/४४८ दि. २३/८/२०१६ चे पत्र.

**विषय क्रमांक :– १०९९ त्वर्य**

रक्कम रू. ९ कोटी १२ महिने मुदतीसाठी गुंतवणूक करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(ज) यांचे जा.क्र. मआ/मुलेविअ/४४९ दि. २३/८/२०१६ चे पत्र.

**विषय क्रमांक :– ११०० त्वर्य**

रक्कम रू. ९ कोटी १२ महिने मुदतीसाठी गुंतवणूक करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(ज) यांचे जा.क्र. मआ/मुलेविअ/४५० दि. २३/८/२०१६ चे पत्र.

**विषय क्रमांक :– ११०१ त्वर्य**

रक्कम रू. ९ कोटी १२ महिने मुदतीसाठी गुंतवणूक करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(ज) यांचे जा.क्र. मआ/मुलेविअ/४५१ दि. २३/८/२०१६ चे पत्र.

**विषय क्रमांक :– ११०२ त्वर्य**

रक्कम रू. ९ कोटी १२ महिने मुदतीसाठी गुंतवणूक करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(ज) यांचे जा.क्र. मआ/मुलेविअ/४५२ दि. २३/८/२०१६ चे पत्र.

**विषय क्रमांक :– ११०३ त्वर्य**

सार्वजनिक स्वच्छता अंतर्गत पुणे शहरातील झोपडपट्टीतील शौचालयांचे नूतनीकरण व पाच वर्षे देखभाल दुरूस्ती व दैनंदिन स्वच्छता करणेकरीता पुणे महानगरपालिका व सामाजिक संस्थांच्या संयुक्त विद्यमाने प्रकल्प राबविणेसाठी खालील बाबीस मान्यता मिळणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/घनकचरा/४५३ दि. २३/८/२०१६ चे पत्र.

१. सन २०१६ १७ मध्ये आर्थिक वर्षात वस्ती पातळीवरील(सामुदायिक) शौचालयाच्या नूतनीकरण दुरूस्ती व मेंटेंन्सकरीता उपलब्ध असलेल्या तरतुदी नुसार शौचालयाचे नूतनीकरण व दुरूस्ती करणेस व पुढील आर्थिक वर्षात उपलब्ध होणा–या तरतूदीतून उर्वरीत काम करणेस.

२. सदर कामी जाहीर प्रकटनाद्वारे मागविण्यात आलेल्या प्रस्तावापैकी प्रति शौचालय सिट करिता सर्वात कमी दर रु.३२,०००/– प्रस्तावित करणाऱ्या मे. समग्र एमपॉवरमेंट फाऊंडेशन, पत्ता –सिनरझीप बिल्डींग,स.नं.२३, प्लॉ.नं.१८९, कर्वेनगर, पुणे – ४११ ०५२ या संस्थेकडून काम करून घेणेस व कामाचे मोजमापानुसार मोबदला रक्कम अदा करणेस.

३ सदर संयुक्त प्रकल्पाच्या अनुषंगाने मे. समग्र एमपॉवरमेंट फाऊंडेशन या संस्थेसोबत करारनामा करणेस व करारनामा करणेचे अधिकार मा.महापालिका आयुक्त यांना प्रदान करणेस.

४ सदरील प्रकल्प यशस्वीरीत्या राबविला गेल्यास व भविष्यात याच धर्तीवर इतर सामाजिक संस्था अगर समग्र एमपॉवरमेंट फाऊंडेशन ही संस्था अन्य ठिकाणी/ सार्वजनिक ठिकाणी देखील सदर प्रकल्प राबविण्यास तयार असल्यास त्यांना देखील प्रति शौचालय सिट र.रू.३२,०००/– नुसार सदर संयुक्त प्रकल्पामध्ये समाविष्ट करून घेणेस .

५ प्रस्तावित केलेल्या शौचालयांची किमान ५ वर्षे कालावधीकरीता देखभाल, किरकोळ दुरुस्ती व स्वच्छता समग्र एमपॉवरमेंट फाऊंडेशन या संस्थेमार्फत करुन घेणेस

६ ज्या शौचालयांमध्ये पुर्वीपासून केअर टेकर कार्यरत आहेत, त्यांना प्रकल्पात सामावून घेण्याची जबाबदारी सदर संस्थेची राहील. जिथे सदर केअर टेकर यांना प्रकल्पात सामावून घेणे शक्य नसेल व वाद उद्‌भवला असेल तर त्याबाबत अंतिम निर्णय घेण्याचा अधिकार मा.महापालिका आयुक्त यांना प्रदान करणेस.

७ नूतनीकरण करणेत आलेली शौचालये नियमित चालविणेसाठी शौचालय व्यवस्थापक, सफाई कर्मचारी व आवश्यकतेनुसार बचतसखी यांची नेमणूक मे. समग्र एमपॉवरमेंट फाऊंडेशन या संस्थेमार्फत किमान ५ वर्षे कालावधीकरीता करणेस.

८ शौचालय वापरणाऱ्या लोकांकडून शौचालय वापराबाबतचे शुल्क रक्कम रू.२०/–प्रति व्यक्ति प्रति महिना जमा करणेचे अधिकार मे. समग्र एमपॉवरमेंट फाऊंडेशन या संस्थेस प्रदान करणेस.

**विषय क्रमांक :– ११०४ त्वर्य**

पुणे मनपाकरीता कचरा वाहने चालविण्यासाठी वाहनचालक सेवक ठेका पद्धतीने घेणे (बी–२ पध्दतीने) कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ४ टेंडर्सपैकी सर्वात कमी दर देणारे ठेकेदार मे. श्री एंटरप्रायजेस, पुणे व मे. जयभवानी एंटरप्रायजेस, पुणे यांचेकडून टाटा ११०९, १११२,१२१०,१५१०, १६१२,१६१३, २५१६,२५१८, आयशर २०.१६,३०.२५ व लेलॅन्ड कॉमेट,कॉमेट गोल्ड, कॉमेट सुपर, लेलॅन्ड १६१६, लेलॅन्ड २५१६ या एचजीव्ही ट्रान्सपोर्ट सवर्गातील वाहनांसाठी प्रती वाहनचालक रु. ६६०.०० प्रती १२ तास स्प्रेड ओव्हरसह (दररोज ८ तास स्टेअरींग डयूटी+४ तास स्प्रेड ओव्हर) या दराने, टाटा ४०७, ७०९, ७१२, आयशर टिपर, घंटा टिपर, लाईट कॉम्पॅक्टर व डंपर प्लेसर एलएमव्ही ट्रान्सपोर्ट सवर्गातील वाहनांसाठी प्रती वाहनचालक रु. ६४०.०० प्रती ९ तास स्प्रेड ओव्हरसह (दररोज ८ तास स्टेअरींग डयूटी+१ तास स्प्रेड ओव्हर) या दराने व टाटा एस, बजाज जी सी मॅक्स व पियॉजो ॲपे, महिंद्रा जियो (तीन व चार चाकी) या एलएमव्ही ट्रान्सपोर्ट सवर्गातील वाहनांसाठी प्रती वाहनचालकरु. ६२०.०० प्रती ९ तास स्प्रेड ओव्हरसह (दररोज ८ तास स्टेअरींग डयूटी+१ तास स्प्रेड ओव्हर) या दरानुसार मे. श्री एंटरप्रायजेस, पुणे यांचेकडून रक्कम रू.४,२५,००,०००/– व मे. जयभवानी एंटरप्रायजेस, पुणे

यांचेकडून रक्कम रू.४,२५,००,०००/- याप्रमाणे एकूण रक्कम रू. ८,५०,००,०००/- (अक्षरी रक्कम रुपये आठ कोटी पन्नास लाख फक्त) पर्यंत तसेच शासनाने वेळोवेळी निश्चित केलेल्या नविन वाढीव डीए (महागाई भत्त्या) सह आदा करुन आवश्यकतेनुसार घेणेस त्याकामी त्यांचेबरोबर करारनामा करणेस मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे जा.क्र. मआ/मोवावि/४५५ दि. २४/८/२०१६ चे पत्र.

**विषय क्रमांक :- ११०५ त्वर्य**

प्रभाग क्र. ५५ ब मध्ये वडगांव बुद्रुक येथील स.नं. ३५ ते ४० येथील जिजाऊ बहुउदेशिय केंद्राचे अपूर्ण काम पूर्ण करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ५ टेंडर्सपैकी ठेकेदार मे.आयुष एन्टरप्रायजेस यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु.३४,१८,३४३/- पेक्षा १८.९९९९% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु.२७,६८,८६१=२४ अधिक भाववाढ सुत्रानुसार आणि विशेष भाववाढ सुत्रानुसार निर्धारित केलेल्या सिमेंट व लोखंड यांचे बेसिक दरातील प्रत्यक्ष फरकानुसार होणारी वाढ अथवा घट ही अट स्विकृत करुन होणाऱ्या कमी/अधिक रक्कमेपर्यंत काम करुन घेणेस व त्यापोटी त्यांचेशी करारनामा करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(इ) यांचे जा.क्र. मआ/भवन/४५६ दि. २४/८/२०१६ चे पत्र.

**विषय क्रमांक :- ११०६ त्वर्य**

प्रभाग क्र. ५७ मधील हिंदु ह्दय सम्राट बाळासाहेब ठाकरे दवाखाना व जिजामाता प्रसुतीगृह येथे विद्युत विषयक कामे करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ५ टेंडर्सपैकी ठेकेदार मे.शेवाळे इलेक्ट्रीकल्स यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु.२७,८७,२६२/- पेक्षा ९.९९९९% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु.२५,०८,५३८=५९ पर्यंत काम करुन घेण्यास व त्याप्रमाणे त्यांचेशी करारनामा करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(इ) यांचे जा.क्र. मआ/विद्युत/४५७ दि. २४/८/२०१६ चे पत्र.

**विषय क्रमांक :- ११०७ त्वर्य**

पुणे महानगरपालिकेच्या पाणी पुरवठा, एन डी स्कॉड, कर आकारणी व कर संकलन, आरोग्य व क्षेत्रिय कार्यालयाकडे व मनपाकडील इतर विभागांना शासकीय कामासाठी भाडेतत्वावर टुरिस्ट परवाना असलेली जीप या संवर्गातील वाहने मे. स्वयंभू ट्रान्सपोर्ट, पुणे यांचे कडून आवश्यकतेनुसार रक्कम रुपये १७१७/- प्रति वाहन प्रति १२ तास वापर व रक्कम रुपये २९२७/- प्रति वाहन प्रति २४ तास वापर या टेंडरदराप्रमाणे वाढीव रक्कम रुपये ६०,००,०००/- (अक्षरी रक्कम रुपये साठ लक्ष फक्त) रक्कमेपर्यंत घेणेस व सदर वाढीव रक्कमेपर्यंत करण्यात येणाऱ्या कामोपोटी त्यांचेबरोबर करारनामा करणेस मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे जा.क्र. मआ/मोवावि/४५८ दि. २४/८/२०१६ चे पत्र.

म्हणजेच या टेंडरसाठी यापुर्वीची मान्य रक्कम रु. १,२०,००,०००/- व वाढीव खर्च होणारी रक्कम रु. ६०,००,०००/- अशी एकूण रक्कम रु. १,८०,००,०००/- खर्च होणार आहे.

**विषय क्रमांक :- ११०८ त्वर्य**

मा.सौ.लक्ष्मी दुधाने यांचे दि.२२/८/२०१६ चे पत्र.

प्रभाग क्र. ३१ ब मधील सर्व्हे नं.९ येथील प्ले ग्राऊंड विकसित करणेसाठी र.रू. १० लाखाचे खालीलप्रमाणे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २०१६-१७ चे अंदाजपत्रक, १८.सांस्कृतिक केंद्रे, खेळ, पान क्र. ११२, अ.क्र.१, शहरामध्ये सांस्कृतिक भवन, नाटयगृह उभारणे व विविध विकास कामे करणे (यादी एसजे १६), पान क्र.२३६, अ.क्र.७, प्रभाग क्र. ३१ ब मधील दत्तदिगंबर सोसायटीमध्ये सांस्कृतिक हॉल विकसित करणे. | १० लाख | --- |
| **<u>नवीन सुचविलेले काम</u>**<br>प्रभाग क्र. ३१ ब मधील सर्व्हे नं.९ येथील प्ले ग्राऊंड विकसित करणे. | --- | १० लाख |

(मा.मुख्य सभा मान्यता देईल या भरवश्यावर मा.महा.आयुक्त यांनी सदर ठरावाची कार्यवाही करावी.)

**विषय क्रमांक :– ११०९ त्वर्य**

मा.श्रीमती सुरेखा मकवान व मा.राजेंद्र वागसकर यांचे दि.२२/८/२०१६ चे पत्र.

प्रभाग क्र. ३२ अ मध्ये खालील विविध विकास कामे करणेसाठी र.रू. ३० लाखाचे खालील प्रमाणे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २०१६–१७ चे अंदाजपत्रक, क. अंदाजपत्रक, १.पाणीपुरवठा, पान क्र. २४, अ.क्र. १, शहरामध्ये पाण्याच्या नवीन लाईन विकसित करणे, (यादी क्र. एसपी २), | | |
| १)पान क्र. ३९, अ.क्र. १३२, प्रभाग क्र.३२ अ मध्ये कदम वस्ती व शिवणे या ठिकाणी पाण्याची लाईन टाकणे | १० लाख | --- |
| २) पान क्र. ३९, अ.क्र. १३३, प्रभाग क्र.३२ अ मध्ये गल्ली क्र.१ ते १० कर्वेनगर परिसरामध्ये विविध ठिकाणी पाण्याची लाईन टाकणे. | १० लाख | --- |
| ३) पान क्र. ३९, अ.क्र. १३५, प्रभाग क्र.३२ अ मध्ये काकडे पॅलेस परिसरात पाण्याची लाईन टाकणे. | १० लाख | --- |
| <u>नवीन सुचविलेली कामे</u> | | |
| १) प्रभाग क्र. ३२ अ मध्ये कामना वसाहत, मावळे आळी व गोसावी वस्ती येथे ड्रेनेज लाईन टाकणे व कॉंक्रीटीकरण करणे. | --- | १० लाख |
| २) प्रभाग क्र. ३२ अ मध्ये हॅप्पी कॉलनी, गोसावी वस्ती व कर्वेनगर परिसरामध्ये मुख्य ड्रेनेज लाईन चॅम्पीयन व जेटींग मशीनने साफसफाई करणे. | --- | १० लाख |
| ३) प्रभाग क्र.३२ अ मध्ये विविध ठिकाणी ड्रेनेज व चेंबर चॅम्पीयन मशीनने साफसफाई व दुरूस्ती करणे. | --- | १० लाख |

**विषय क्रमांक :– १११० त्वर्य**

मा.सौ.शितल सावंत यांचे दि.२२/८/२०१६ चे पत्र.

मनपा मुख्य सभा ठराव क्र.७३,दि.७.६.२०१६ नुसार प्रभाग क्र. १६ ब मध्ये र.रु.१ कोटीचे वर्गीकरणास मान्यता देण्यात आलेली असून सदर रकमेतुन खालील कामे करणेसाठी रक्कम रूपये ८५ लाखाचे खालीलप्रमाणे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी.

| **अर्थशिर्षक** | **कमी** | **अधिक** |
|---|---|---|
| सन २०१६–१७ चे अंदाजपत्रक<br>मनपा मुख्य सभा ठराव क्र.७३,दि.७.६.२०१६ | ८५ लाख | --- |
| **<u>नविन सुचविलेली कामे –</u>** | | |
| १)प्रभाग क्र.१६ ब मध्ये माजी महापौर भारत सावंत पाम उद्यानामध्ये विविध विकास कामे करणे. | --- | ५० लाख |
| २) प्रभाग क्र.१६ ब मध्ये स्पायडर मशिनच्या सहाय्याने नाले साफ सफाई करणे. | --- | २० लाख |
| ३) प्रभाग क्र.१६ ब मध्ये जेटींग मशिनच्या सहाय्याने ड्रेनेज लाईन साफ सफाई करणे. | --- | १५ लाख |

मा.मुख्य सभा मान्यता देईल या भरवशावर मा.महापालिका आयुक्त यांनी सदर ठरावाची कार्यवाही करावी.

**विषय क्रमांक :– ११११ त्वर्य**

मा.सौ.सुनंदा देवकर व मा.बापूसाहेब कर्णेगुरुजी यांचे दि.२२/८/२०१६ चे पत्र.

प्रभाग क्र.४ अ, मध्ये सर्व बौध्द विहारांमध्ये सुशोभिकरण करणेसाठी रक्कम रूपये २० लाखाचे खालीलप्रमाणे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २०१६–१७ चे अंदाजपत्रक, ४. झोपडपट्टी निर्मुलन व पुनर्वसन निधीतून करावयाची कामे, पान क्र. १३८, अ.क्र. ३, सुलभ पध्दतीची शौचालये बांधणे, (यादी क्र.एसजी २), पान क्र. २५३, अ.क्र. ४, प्रभाग क्र.४ अ, मोहनवाडी, शंकरनगर येथे शौचालय बांधणे. | २० लाख | **---** |
| **<u>नवीन सुचविलेले काम</u>** | | |
| प्रभाग क्र.४ अ, मध्ये सर्व बौध्द विहारांमध्ये सुशोभिकरण करणे. | **---** | २० लाख |

मा.मुख्य सभा मान्यता देईल या भरवशावर मा.महापालिका आयुक्त यांनी सदर ठरावाची कार्यवाही करावी.

**विषय क्रमांक :- १११२ त्वर्य**

मा.सौ.सुनंदा देवकर व मा.बापूसाहेब कर्णेगुरुजी यांचे दि.२२/८/२०१६ चे पत्र.

प्रभाग क्र.४ अ, मध्ये विविध ठिकाणी ड्रेनेज लाईन टाकणे व साफ सफाई करणेसाठी रक्कम रूपये ४० लाखाचे खालीलप्रमाणे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २०१६-१७ चे अंदाजपत्रक,<br>१)४. झोपडपट्टी निर्मुलन व पुनर्वसन निधीतून करावयाची कामे, पान क्र. १३८, अ.क्र. ३, सुलभ पध्दतीची शौचालये बांधणे, (यादी क्र.एसजी २), पान क्र. २५३, अ.क्र. ३, प्रभाग क्र.४ अ, मध्ये पंचशिलनगर, दयावान मित्र मंडळ येथे शौचालय बांधणे. | २० लाख | --- |
| २) १०.च, स्ट्रॉम वॉटर ड्रेन प्रकल्प, पान क्र. १०४, अ.क्र. १, पुणे शहरातील पावसाळी पाण्याच्या व्यवस्थापनासाठी नाला सुधारणा कामे, कल्व्हर्टस व पावसाळी लाईन टाकणे, (यादी क्र.एसएफ १), पान क्र.२१४, अ.क्र.३, प्रभाग क्र.४ अ, मध्ये विविध ठिकाणी पावसाळी लाईन टाकणे. | २० लाख | --- |
| **<u>नवीन सुचविलेले काम</u>**<br>प्रभाग क्र.४ अ, मध्ये विविध ठिकाणी ड्रेनेज लाईन टाकणे व साफ सफाई करणे. | --- | ४० लाख |

मा.मुख्य सभा मान्यता देईल या भरवशावर मा.महापालिका आयुक्त यांनी सदर ठरावाची कार्यवाही करावी.

**विषय क्रमांक :- १११३ त्वर्य**

मा.शंकर केमसे, सभागृह नेता व मा.सौ.चंचला कोद्रे यांचे दि.२२/८/२०१६ चे पत्र.

प्रभाग क्र.२० अ मध्ये खालील विविध विकास कामे करणेसाठी र.रू. १.१० कोटीचे खालीलप्रमाणे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २०१६-२०१७ चे अंदाजपत्रक, बजेट कोड- CE20A103/A13-111, पान क्र.१७९, पुणे शहरामध्ये पादचाऱ्यांसाठी वर्दळ असणारे व अतिमहत्वाचा रस्त्यांवर पदचाऱ्यांसाठी उच्च दर्ज्याचे अडथळा विरहित फुटपाथ व इतर अनुषंगिक कामे करणे | १.१०कोटी | --- |
| **<u>नवीन सुचविलेली कामे</u>** | | |
| १) मुंढवा भाजी मार्केटचे उर्वरित काम करणे. | --- | ३० लाख |
| २) मगरपट्टा स.नं.१५९ येथील युथ गाइडन्स सेंटर(स्कूल)चे उर्वरित काम करणे | --- | ५० लाख |
| ३) कै. अण्णासाहेब मगर दवाखान्यातील उर्वरित काम करणे. | --- | ३० लाख |

मा.मुख्य सभा मान्यता देईल या भरवशावर मा.महापालिका आयुक्त यांनी सदर ठरावाची कार्यवाही करावी.

**विषय क्रमांक :- १११४ त्वर्य**

मा.सौ.अश्विनी जाधव यांचे दि.२३/८/२०१६ चे पत्र.

मुख्यसभा ठ.क्र. ७३ दि. ७/६/२०१६ अनुसार प्रभाग क्र.२६ अ, मध्ये र.रू. १ कोटीचे वर्गीकरण करण्यास मान्यता देण्यात आलेली असून सदर रकमेतून खालील प्रमाणे र.रुपये ८५ लाखाचे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २०१६-२०१७ चे अंदाजपत्रक, | | |
| १) प्रभाग क्र.२६ अ, मध्ये विविध ठिकाणी विद्युत विषयक कामे करणे. | --- | ४५ लाख |
| २) प्रभाग क्र.२६ अ, मध्ये विविध ठिकाणी नवीन ड्रेनेज लाईन टाकणे. | --- | ४० लाख |

मा.मुख्य सभा मान्यता देईल या भरवशावर मा.महापालिका आयुक्त यांनी सदर ठरावाची कार्यवाही करावी.

**विषय क्रमांक :– १११५ त्वर्य**

मा.बंडू उर्फ सुनिल गायकवाड यांचे दि.२३/८/२०१६ चे पत्र.

प्रभाग क्र.२० ब मधील सर्वोदय कॉलनी येथे असलेल्या विरंगुळा केंद्रभोवती विविध विकास कामे करणेसाठी रक्कम रूपये १० लाखाचे खालीलप्रमाणे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २०१६–१७ चे अंदाजपत्रक, १२. भवने, भुमि व मनपा वसाहतीची व्यवस्था, पान क्र.१०८, अ.क्र. ६५, शहरामध्ये विरंगुळा केंद्रे, ध्यानकेंद्रे महिला बचत गट हॉल/ आधारकेंद्रे उभारणे (यादी क्र. एसजे २०), पान क्र. २३१, अ.क्र. १४, प्रभाग क्रं.२० ब सर्वोदय कॉलनी येथे बांधण्यात आलेल्या समाजमंदिर/विरंगुळा केंद्रभोवती सिमाभिंत बांधणे. | १० लाख | ––– |
| नविन सुचविलेले काम<br>प्रभाग क्र.२० ब मधील सर्वोदय कॉलनी येथे असलेल्या विरंगुळा केंद्रभोवती विविध विकास कामे करणे. | –– | १० लाख |

**विषय क्रमांक :– १११६ त्वर्य**

मा.सौ.मंजुषा नागपुरे व मा.सौ.मुक्ता टिळक यांचे दि.२३/८/२०१६ चे पत्र.

पुणे मनपा मा.मुख्यसभा माहे जुन २०१६ दि. ७/६/२०१६ च्या कार्यपत्रिकेवर विषय क्र. ४५/२९५ (मा.स्थायी समिती ठराव क्र. ४२५ दि. ७/६/२०१६) अनुसरुन प्रभाग क्र. ५३ अ करिता र.रू. ७५ लाखांची तरतूद वर्गीकरणातून उपलब्ध झालेली आहे. सदर तरतूदीमधून खाली नमूद केल्याप्रमाणे कामे करण्यास मान्यता द्यावी.

| अ.क्र. | अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|---|
| १ | सन २०१६–१७ चे अंदाजपत्रक प्रभाग क्र. ५३ अ मध्ये विविध विकास कामे करणे. | ७५ लाख | ––– |
| | **नवीन सुचविलेली कामे** | | |
| १ | प्रभाग क्र. ५३ अ मध्ये हिंगणे खु. व आनंदनगर परिसरातील रस्ते विकसित करणे. | ––– | २० लाख |
| २ | प्रभाग क्र. ५३ अ मध्ये विविध ठिकाणी पिण्याच्या पाईप लाईनची कामे करणे. | ––– | १० लाख |
| ३ | प्रभाग क्र. ५३ अ मध्ये घनकचरा व्यवस्थापन विषयक कामे करणे. | ––– | १० लाख |
| ४ | प्रभाग क्र. ५३ अ मध्ये विविध ठिकाणी रस्ते विकसित करणे. | ––– | १० लाख |
| ५ | प्रभाग क्र. ५३ अ मध्ये विश्रांतीनगर हिंगणे खु. ते समर्थनगर दोन्ही कॅनॉलच्या मधील मोकळया जागेत उद्यान विकसित करणे. | ––– | २५ लाख |

**विषय क्रमांक :– १११७ त्वर्य**

मा.सौ.लक्ष्मी घोडके व मा.अरविंद शिंदे, विरोधी पक्षनेता यांचे दि.२३/८/२०१६ चे पत्र.

मा.मुख्य सभा ठराव क्र.७३ विषय क्र.४५/२९५ दि.७/६/२०१६ मधील प्रभाग क्र. ४०अ मध्ये विविध विकासाची कामे करणे यासाठी र.रू.१ कोटीचे खालीलप्रमाणे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी.

१. प्रभाग क्र. ४० अ मध्ये थर्मोप्लास्टिक पेंट करणे व तदनुषंगिक कामे करणे. र.रुपये २५ लाख

२. प्रभाग क्र. ४० अ मध्ये विविध ठिकाणी डांबरीकरण करणे. र.रुपये २५ लाख

३. प्रभाग क्र. ४० अ मध्ये नवीन फुटपाथ करणे, रेलिंग बसविणे व तदनुषंगिक कामे करणे. र.रुपये २५ लाख

४. प्रभाग क्र. ४० अ मध्ये मनपा शाळांमध्ये विविध विकासकामे करणे. र.रू.२५ लाख

**विषय क्रमांक :– १११८ त्वर्य**

मा.शंकर केमसे, सभागृह नेता व मा.डॉ.सिध्दार्थ धेंडे यांचे दि.२४/८/२०१६ चे पत्र.

पुणे महानगरपालिकेतील सेवा ( सेवाप्रवेश व सेवांचे वर्गीकरण ) नियम तयार करण्यासाठी सेवाप्रवेश नियम २०१४ अस्तित्वात येण्यापूर्वी पदोन्नती व नामनिर्देशना साठी असलेली बऱ्याच पदांची शैक्षणिक अर्हता,नव्याने तयार करण्यात आलेल्या नियमात बदलण्यात आली असल्याने अनेक कर्मचारी पदोन्नतीपासून कायमस्वरुपी वंचित राण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

शासनाच्या नगरविकास विभागाकडून याबाबत जा.क्र.पी.एम.सी. ३०१६/प्र.क्र. ३२१/नवि.२२, दि.२६/५/२०१६ चे पत्राने पुणे मनपा सेवा (सेवाप्रवेश व सेवांचे वर्गीकरण) नियम २०१४ मध्ये सुधारणा करण्याबाबत सूचित करण्यात आले आहे. परंतु त्याची अद्याप प्रशासनाने दखल घेतलेली नाही.

पुणे महानगरपालिकेतील मोकादम,असिस्टंट इलेक्ट्रिशियन,इलेक्ट्रिशियन, जमादार, वरीष्ठ लिपिक,अशा अनेक पदोन्नतीच्या पदांसाठी तसेच काही पदांचा नामनिर्देशना साठीचे शैक्षणिक अर्हतेत देखील बदल करण्यात आले आहे. उदा.मोकादम या पदाची शैक्षणिक अर्हता एस.एस.सी.उत्तीर्ण करण्यात आली आहे. सदर शैक्षणिक अर्हतेतील बदलामुळे अनेक वर्षाचा अनुभव असून देखील कर्मचाऱ्यांना पदोन्नती मिळणेपासून वंचित रहावे लागत आहे.

सदर सेवाप्रवेश नियमावली २०१४ मधील शैक्षणिक अर्हतेतील बदल दि.२६/८/२०१४ नंतर महापालिका सेवेत रुजू होणाऱ्या सेवकांना लागू करण्यात यावा. दि.२६/८/२०१४ पूर्वी मनपा सेवेत कार्यरत सेवकांना सदर सेवाप्रवेश नियमावली २०१४ मधील शैक्षणिक अर्हता लागू करण्यात येवू नये.

**विषय क्रमांक :- १११९ त्वर्य**

मा.अनिल राणे यांचे दि.२४/८/२०१६ चे पत्र.

प्रभाग क्र.३६ अ मध्ये भांडारकर रोड गल्ली क्र.३ विविध रस्ते सिमेंट कॉंक्रीटीकरण करणे या कामाची निविदा मे.सनराज कन्स्ट्रक्शन यांस मिळाली असून एस्टिमेट र.रुपये १,६९,६४,१४३/- चे असून टेंडर रक्कम रुपये१,१६,६४,१४३/- इतकी २४.५३ टक्के बिलोने आहे. सदर कामास मा.स्थायी समिती ठ.क्र.२०८६ दि.१९/१/२०१६ ने मान्यता मिळाली आहे. तरी सदर कामाची पू.ग.प. (र.रुपये १,६९,६४,१४३/-) पर्यंत खर्च करणेस मान्यता देण्यात यावी.

**विषय क्रमांक :- ११२० त्वर्य**

मा.अनिल राणे यांचे दि.२४/८/२०१६ चे पत्र.

प्रभाग क्र.३६ अ मधील खिलारे पथ, पवार पथ, सोनल हॉलजवळील अंतर्गत रस्ता एरंडवणा गावठाण येथील अंतर्गत रस्ते यु.टी.डब्ल्यु.टी पध्दतीने कॉंक्रीटीकरण करणे या कामाची निविदा मे.सनराज कन्स्ट्रक्शन यांस मिळाली असून एस्टिमेट र.रुपये१,८९,९९,५२०/- चे असून टेंडर र.रुपये१,८९,९९,५२०/- इतकी २४.२६ टक्के बिलोने आहे. सदर कामास मा.स्थायी समिती ठ.क्र.१८४९ दि.१५/१२/२०१५ ने मान्यता मिळाली आहे. तरी सदर कामाची पू.ग.प. (र.रुपये१,८९,९९,५२०/-) पर्यंत खर्च करणेस मान्यता देण्यात यावी.

**विषय क्रमांक :- ११२१ त्वर्य**

मा.श्रीमती स्मिता वस्ते यांचे दि.२४/८/२०१६ चे पत्र.

पुणे मनपा मा.मुख्यसभा माहे जुन २०१६ दि. ७/६/२०१६ च्या कार्यपत्रिकेवर विषय क्र. ४५/२९५ (मा.स्थायी समिती ठराव क्र. ४२५ दि. ७/६/२०१६) अनुसरुन प्रभाग क्र. ५७ अ करिता र.रू. ७५ लाखांची तरतूद वर्गीकरणातून उपलब्ध झालेली आहे. सदर तरतूदीमधून खाली नमूद केल्याप्रमाणे कामे करण्यास मान्यता द्यावी.

| अ.क्र. | अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|---|
| १ | सन २०१६-१७ चे अंदाजपत्रक प्रभाग क्र. ५७ अ मध्ये विविध विकास कामे करणे. | ७५ लाख | --- |
| | नवीन सुचविलेले कामे | | |
| १ | प्रभाग क्र. ५७ अ पेशवे उद्यानातील म्युझिकल फाउंटनचे उर्वरित विकास कामे करणे. | --- | ७५ लाख |

**विषय क्रमांक :- ११२२ त्वर्य**

मा.सौ.माधुरी सहस्त्रबुध्दे यांचे दि.२४/८/२०१६ चे पत्र.

पुणे मनपा मा.मुख्यसभा माहे जुन २०१६ दि. ७/६/२०१६ च्या कार्यपत्रिकेवर विषय क्र. ४५/२९५ (मा.स्थायी समिती ठराव क्र. ४२५ दि. ७/६/२०१६) अनुसरुन प्रभाग क्र. ३६ ब करिता र.रू. ७५ लाखांची तरतूद वर्गीकरणातून उपलब्ध झालेली आहे. सदर तरतूदीमधून खाली नमूद केल्याप्रमाणे कामे करण्यास मान्यता द्यावी.

| अ.क्र. | अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|---|
| १ | सन २०१६-१७ चे अंदाजपत्रक प्रभाग क्र. ३६ ब मध्ये विविध विकास कामे करणे. | ७५ लाख | --- |

| | नवीन सुचविलेले कामे | | |
|---|---|---|---|
| १ | प्रभाग क्र. ३६ ब मध्ये एस.एन.डी.टी. कॉलेज ते बालभारती पर्यंत डाव्या बाजूचा फुटपाथ नव्याने विकसित करणे. | --- | ७५ लाख |

**विषय क्रमांक :- ११२३ त्वर्य**

मा.श्रीमती सुरेखा मकवान व मा.श्रीमती सुशिला नेटके यांचे दि.२४/८/२०१६ चे पत्र.

प्रभाग क्र. ३२ अ मध्ये खालील विविध विकास कामे करणेसाठी र.रू. २० लाखाचे खालील प्रमाणे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २०१६-१७ चे अंदाजपत्रक, अंदाजपत्रक अ व क मधील क्षेत्रिय कार्यालयाने करावयाची योजनेत्तर कामे, वारजे-कर्वेनगर क्षेत्रिय कार्यालय, पान क्र. १६/५६, | | |
| १)प्रभाग क्र. ३२ मध्ये, सम्राट अशोक शाळा येथे विविध विकास कामे करणे. | १० लाख | --- |
| २) प्रभाग क्र. ३२ मध्ये, मनपा दवाखाने, आरोग्य कोठी इत्यादी ठिकाणी देखभाल दुरूस्तीची कामे करणे. | १० लाख | --- |
| <u>नवीन सुचविलेली कामे</u> | | |
| १) प्रभाग क्र. ३२ अ मध्ये विविध ठिकाणी हॉर्टीकल्चर विषयक कामे करणे. | --- | १० लाख |
| २) प्रभाग क्र. ३२ अ मध्ये विविध ठिकाणी देशी व विदेशी वृक्ष पुरविणे व शोभीवंत फुले, झाडांच्या कुंडया पुरविणे. | --- | १० लाख |

**विषय क्रमांक :- ११२४ त्वर्य**

मा.फारुक इनामदार व मा.सुनिल गोगले यांचे दि.२४/८/२०१६ चे पत्र.

हडपसर गाडीतळ गणपती मंदिर प्रभाग क्र.४४ पी.एम.पी.एम.एल.बसस्टँड समोर मे.अक्षय एजन्सी यांनी स्वखर्चाने सुधारणा केली असून सदरचे शौचालय मे.अक्षय एजन्सी यांना चालविण्यास देण्यासाठी २० वर्षाचा करारनामा करण्यास मान्यता द्यावी.

**विषय क्रमांक :- ११२५ त्वर्य**

मा.सौ.अश्विनी कदम व मा.सौ.सुमन पठारे यांचे दि.२४/८/२०१६ चे पत्र.

प्रभाग क्र.६७ ब मध्ये विविध ठिकाणी विद्युत विषयक कामे करणेसाठी र.रु.२५ लाखाचे खालीलप्रमाणे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी

| **अर्थशिर्षक** | **कमी** | **अधिक** |
|---|---|---|
| सन २०१६-१७ चे अंदाजपत्रक, १०.ग.विद्युत विभाग, पान क्र. १०४, अ.क्र. ३९, शहरामध्ये भूमिगत केबल टाकणे, (यादी क्र. एसबी ७), पान क्र.२१०, अ.क्र.१००, प्रभाग क्र.६७ ब तावरे कॉलनी चौक ते लोकेश हॉटेल येथील एम.एस.ई.बी.लाईन भूमिगत करणे | २५ लाख | --- |
| **<u>नविन सुचविलेले काम -</u>** | | |
| प्रभाग क्र.६७ ब मध्ये विविध ठिकाणी विद्युत विषयक कामे करणे | --- | २५ लाख |

मा.मुख्य सभा मान्यता देईल या भरवशावर मा.महापालिका आयुक्त यांनी सदर ठरावाची कार्यवाही करावी.

**विषय क्रमांक :- ११२६ त्वर्य**

मा.सुभाष जगताप यांचे दि.२४/८/२०१६ चे पत्र.

मा.मुख्य सभा ठराव क्र. ४२४ दि. १०/८/२०१६ अन्वये सन २०१६-१७ चे अंदाजपत्रक प्रभाग क्र. ६८ तळजाई मंदिर परिसरातील रस्ते करणेसाठी र.रू. १ कोटी वर्गीकरणास मान्यता मिळाली आहे. या ठरावामध्ये तळजाई मंदिर येथे म्युझिक कारंजे करणे या अर्थशीर्षकामधून कमी करण्यात आले आहेत. ही प्रिटींगमधील चुक असून तळजाई येथे म्युझिक कारंजे करणे ऐवजी तळजाई येथे तारांगण करणे मधून र.रुपये १ कोटी कमी करणे अशी दुरूस्ती करण्यास मान्यता द्यावी.

**विषय क्रमांक :- ११२७ त्वर्य**

मा.शंकर केमसे, सभागृह नेता यांचे दि.२४/८/२०१६ चे पत्र.

बोपोडी येथील नेत्र रूग्णालय येथे विद्युत विषयक कामे करणेसाठी र.रू. १.१५ कोटीचे खालीलप्रमाणे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २०१६-२०१७ चे अंदाजपत्रक,<br>१)१२.भवने, भूमी व मनपा वसाहती यांची व्यवस्था, पान क्र. १०६, अ.क्र. ११, भवन विभागांतर्गत विविध विकासाची कामे करणे (यादी क्र. एसजे १०), पान क्र.२२७, अ.क्र.८६, पुणे शहराच्या प्रवेशव्दारावरील सर्व प्रमुख रस्त्यावर स्वागत कमानी उभारणे | ४० लाख | --- |
| २) १६.उद्याने, प्राणीसंग्रहालये, पान क्र. ११०, अ.क्र. ५, शहरातील विविध उद्यानांमध्ये विकास कामे करणे, (यादी क्र.एसयु १), पान क्र.२४६, अ.क्र.२०५, कात्रज तलाव पाटीलवाडा व फुलराणी बोगदा येथे विशिष्ट प्रकारची आर्कषक विद्युत रोषणाई करणे व तदूषंगीक कामे करणे | ७५ लाख | --- |
| <u>नवीन सुचविलेले काम</u><br>बोपोडी येथील नेत्र रूग्णालय येथे विद्युत विषयक कामे करणे. | --- | १कोटी १५ लाख |

मा.मुख्य सभा मान्यता देईल या भरवशावर मा.महापालिका आयुक्त यांनी सदर ठरावाची कार्यवाही करावी.

**विषय क्रमांक :- ११२८ त्वर्य**

मा.फारुक इनामदार व मा.राजेंद्र शिळीमकर यांचे दि.२४/८/२०१६ चे पत्र.

जय सार्वजनिक ग्रंथालय,स.क्र.८/१०-११ गल्ली क्र.२ कर्वेनगर पुणे या संस्थेस र.रु.२५,०००/- देणगी देण्यासाठी खालील प्रमाणे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी.

| **अर्थशिर्षक** | **कमी** | **अधिक** |
|---|---|---|
| सन २०१६-२०१७ चे अंदाजपत्रक यादी क्र.एस.आर.६,सार्वजनिक संस्थांना देणग्या पान क्र.१५८,अ.क्र.२०,गरवारे बालभवन ट्रस्ट,पुणे. | २५,०००/- | --- |
| **<u>सार्वजनिक संस्थांना देणग्या</u>**<br>जय सार्वजनिक ग्रंथालय,स.क्र.८/१०-११ गल्ली क्र.२ कर्वेनगर पुणे | --- | २५,०००/- |

**विषय क्रमांक :- ११२९ त्वर्य**

मा.धनंजय जाधव व मा.राजेंद्र शिळीमकर यांचे दि.२४/८/२०१६ चे पत्र.

पुणे मनपा मा.मुख्यसभा माहे जुन २०१६ दि. ७/६/२०१६ च्या कार्यपत्रिकेवर विषय क्र. ४५/२९५ (मा.स्थायी समिती ठराव क्र. ४२५ दि. ७/६/२०१६) अनुसरुन प्रभाग क्र. ५१ अ करिता र.रू. ७५ लाखांची तरतूद वर्गीकरणातून उपलब्ध झालेली आहे. सदर तरतूदीमधून खाली नमूद केल्याप्रमाणे कामे करण्यास मान्यता द्यावी.

| अ.क्र. | अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|---|
| १ | सन २०१६-१७ चे अंदाजपत्रक प्रभाग क्र. ५१ अ मध्ये विविध विकास कामे करणे. | ७५ लाख | --- |
| | **नवीन सुचविलेली कामे** | | |
| १ | प्रभाग क्र. ५१ अ मध्ये विविध ठिकाणी स्टेनलेस स्टिलचे डस्टबिन बसविणे. | --- | २० लाख |
| २ | प्रभाग क्र. ५१ अ मध्ये सदाशिव पेठ, नवी पेठ परिसरात यु.टी.डब्ल्यू.टी. रस्ते करणे. | --- | २० लाख |
| ३ | प्रभाग क्र. ५१ अ मध्ये कचरा गोळा करण्याकरिता ढकलगाडया पुरविणे. | --- | १० लाख |
| ४ | प्रभाग क्र. ५१ अ मध्ये अभ्यासिका व मल्टीपर्पज हॉलमध्ये विविध सुधारणा कामे करणे. | --- | १० लाख |
| ५ | प्रभाग क्र. ५१ अ मध्ये ज्युटबॅग पुरविणे. | --- | १० लाख |
| ६ | प्रभाग क्र. ५१ अ मध्ये रमाबाई आंबेडकर हॉस्पिटल येथे विविध विकास कामे करणे. | --- | ०५ लाख |

**विषय क्रमांक :- ११३० त्वर्य**

मा.राजेंद्र शिळीमकर व मा.फारुक इनामदार यांचे दि.२४/८/२०१६ चे पत्र.

प्रभाग क्र.६२ अ मध्ये कोंढवा ईस्कॉन मंदिर जवळ मल्टीस्टोरेज पार्किंग करणेसाठी र.रू. ७५ लाखाचे खालीलप्रमाणे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २०१६-२०१७ चे अंदाजपत्रक, १०.पथ, १०.क.पथ सुधारणा, पान क्र. १००, अ.क्र. २, शहरामधील फुटपाथ विकसित करणे, (यादी क्र. एसए १३), पान क्र.१७९, पुणे शहरामध्ये पादचाऱ्यांसाठी वर्दळ असणारे व अतिमहत्वाचा रस्त्यांवर पदचाऱ्यांसाठी उच्च दर्ज्याचे अडथळा विरहित फुटपाथ व इतर अनुषंगिक कामे करणे (बजेट कोड- CE20A103/A13-111) | ७५ लाख | --- |
| **<u>नविन सुचविलेले काम -</u>** | | |
| प्रभाग क्र.६२ अ मध्ये कोंढवा ईस्कॉन मंदिर जवळ मल्टीस्टोरेज पार्किंग करणे. | --- | ७५ लाख |

मा.मुख्य सभा मान्यता देईल या भरवशावर मा.महापालिका आयुक्त यांनी सदर ठरावाची कार्यवाही करावी.

**विषय क्रमांक :- ११३१ त्वर्य**

मा.फारुक इनामदार व मा.अविनाश बागवे यांचे दि.२४/८/२०१६ चे पत्र.

प्रभाग क्र. ७६ अप्पर बिबवेवाडी मध्ये खालील विविध विकास कामे करणेसाठी र.रू. १ कोटी खालीलप्रमाणे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २०१६-२०१७ चे अंदाजपत्रक, १०.पथ, १०.क.पथ सुधारणा, पान क्र. १००, अ.क्र. २, शहरामधील फुटपाथ विकसित करणे, (यादी क्र. एसए १३), पान क्र.१७९, पुणे शहरामध्ये पादचाऱ्यांसाठी वर्दळ असणारे व अतिमहत्वाचा रस्त्यांवर पदचाऱ्यांसाठी उच्च दर्ज्याचे अडथळा विरहित फुटपाथ व इतर अनुषंगिक कामे करणे (बजेट कोड- CE20A103/A13-111) | १ कोटी | --- |
| **<u>नविन सुचविलेली कामे -</u>** | | |
| १)प्रभाग क्र.७६अप्पर बिबवेवाडी मध्ये विविध ठिकाणीकॉक्रीटीकरण करणे | --- | २५ लाख |
| २) प्रभाग क्र.७६ अप्पर बिबवेवाडी मध्ये विविध ठिकाणी पोल व एल.ई.डी लाईट फिटींग बसविणे | --- | २५ लाख |
| ३) प्रभाग क्र.७६ अप्पर बिबवेवाडी मध्ये विविध ठिकाणी नवीन ड्रेनेज लाईन टाकणे | --- | २५ लाख |
| ४) प्रभाग क्र.७६ अप्पर बिबवेवाडी मध्ये मध्ये विविध ठिकाणी विद्युत तारा भूमिगत करणे | --- | २५ लाख |

मा.मुख्य सभा मान्यता देईल या भरवशावर मा.महापालिका आयुक्त यांनी सदर ठरावाची कार्यवाही करावी.

**विषय क्रमांक :- ११३२ त्वर्य**

मा.डॉ.सिध्दार्थ धेंडे व मा.सुनिल गोगले यांचे दि.२४/८/२०१६ चे पत्र.

पुणे महानगरपालिका (सेवाप्रवेश व सेवांचे वर्गीकरण) नियम २०१४ मध्ये पुणे महानगरपालिका आस्थापनेवरील सरळसेवेच्या पदांमध्ये वर्ग ३ आणि ४ मधील शेड्युल मान्य पदां वरील सेवकांसाठी काही पदांवर २५% प्रमाणात आरक्षण ठेवलेले आहे. असे आरक्षण काही ठराविक पदांसाठीच असल्याने इतर पदांची अर्हता धारण करणाऱ्या सेवकांवर अन्याय होत असल्याचे दिसून येत आहे

सबब सरळ सेवेच्या वर्ग ३ मधील सर्व पदांना २५% जागांचे आरक्षण पुणे महानगर पालिका आस्थापनेवरील वर्ग ३ आणि ४ मधील शेड्युलमान्य पदांवरील सेवकांचे पदोन्नतीने नियुक्तीसाठी राखून ठेवण्यास तसेच त्यांना पदोन्नतीने नियुक्ती देताना अनुभवाचे अटीमधून सूट देण्यास तथापि त्यांचा अनुभवाचा कालावधी पूर्ण होईपर्यंत पदोन्नतीच्या पदावर त्यांची नियुक्ती परिविक्षधिन समजण्यास मान्यता द्यावी

**विषय क्रमांक :- ११३३ त्वर्य**

मा.शंकर केमसे, सभागृह नेता, मा.फारुक इनामदार व मा.सौ.सुमन पठारे यांचे दि.२४/८/२०१६ चे पत्र.

राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावरील महापौर केसरी कुस्ती स्पर्धेसाठी र.रू. ७५ लाखाचे खालीलप्रमाणे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २०१६-२०१७ चे अंदाजपत्रक, १०.पथ सुधारणा (विशेष कार्याधिकारी), पान क्र. ६२, ख.२ पथ दुरुस्ती (विभागीय कार्यलय) बजेट कोड- RE20B###E साईन बोर्डस् रंगविणे, रंगरंगोटी, रेलींगची कामे व डिव्हायडरची कामे करणे. | ७५ लाख | --- |
| **<u>नवीन सुचविलेली कामे</u>** सन२०१६-१७ अंदाजपत्रक, बजेट कोड- RE27A120, 17. खेळ व क्रीडांगणे, क. पंडीत जवाहरलाल नेहरू स्टेडियम, २०.राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावरील महापौर केसरी कुस्ती स्पर्धा. | --- | ७५ लाख |

तसेच खर्च करण्यापुर्वी मा.स्थायी समितीची मान्यता घेण्यात यावी.

मा.मुख्य सभा मान्यता देईल या भरवशावर मा.महापालिका आयुक्त यांनी सदर ठरावाची कार्यवाही करावी.

**विषय क्रमांक :- ११३४ त्वर्य**

मा.सौ.अश्विनी कदम, मा.सौ.मुक्ता टिळक, मा.सौ.सुमन पठारे, मा.सौ.सुनिता गलांडे, मा.श्रीमती सुशिला नेटके, मा.सुनिल गोगले, मा.श्रीकांत जगताप, मा.राजेंद्र शिळीमकर, मा.अविनाश बागवे, मा.अॅड्.रामचंद्र उर्फ चंदुशेठ कदम, मा.सौ.आरती बाबर, मा.सौ.दिपाली ओसवाल, मा.डॉ.सिध्दार्थ धेंडे, मा.फारुक इनामदार यांचे दि. २४/८/२०१६ चे पत्र.

पुणे शहरात विविध बचतगट चांगल्या प्रकारे काम करीत आहेत. त्यांच्या उत्पादनांना बाजारपेठ व त्यांच्या उपक्रमाची माहिती नागरिकांना होण्यासाठी नजीकच्या गणेशोत्सव, दसरा, दिवाळी सणांमध्ये उत्तेजन/ बाजारपेठ उपलब्ध होणे शक्य आहे.

त्यादृष्टीने सारसबाग कोपरा ते समाधान कोपरा ते समाधान भेळ दरम्यान व शंकर महाराज मठ ते पेट्रोल पंपाजवळ सातारा रोड धनकवडी येथे महिला बचतगट बाजार गणेशोत्सवा पासून भरविणे बाबत (नागरवस्ती विभागामार्फत) व त्यादृष्टीने बचतगटांना उत्तेजना देणेस तसेच पुणे शहरामध्ये विविध ठिकाणी बचत बाजार भरविण्यात येणेसाठी तसेच गणेश मुर्ती विक्रीसाठी स्टॉलला ज्या पध्दतीने परवानगी देण्यात येते त्याप्रमाणे परवानगी देण्यास मान्यता देणेत यावी.

**विषय क्रमांक :- ११३५ त्वर्य**

मा.फारुक इनामदार व मा.सुनिल गोगले यांचे दि.२४/८/२०१६ चे पत्र.

वानवडी गाव येथील स्मशानभूमीमध्ये विद्युत दाहीनी उभारणेसाठी रक्कम रु. १ कोटीचे खालीलप्रमाणे वर्गीकरण करण्यात यावे.

| अर्थशिर्षक | कमी र. रू. | अधिक र. रू. |
|---|---|---|
| **<u>सन २०१६-१७ चे अंदाजपत्रक</u>** यादी क्र. जे-१ पा. क्र. २१६ शहरातील विविध ठिकाणी मनपासाठी इमारती बांधणे व विकास कामे करणे अ.क्र. १६ -पुणे मनपाच्या विविध खात्याकडील रेकॉर्ड जतन करण्यासाठी नायडू कोठी आवारात प्रशासकीय इमारत बांधणे. **बजेट कोड CE22 A690** | **१ कोटी** | ----- |
| **<u>नवीन सुचविलेले काम</u>** | | |
| वानवडी गाव येथील स्मशानभूमीमध्ये विद्युत दाहीनी उभारणे. | ----- | **१ कोटी** |

**विषय क्रमांक :– ११३६ त्वर्य**

मा.अविनाश बागवे, मा.फारुक इनामदार व मा.ॲड्.रामचंद्र उर्फ चंदू कदम यांचे दि.२४/८/२०१६ चे पत्र.

कोरेगांव पार्क फा.प्लॉट नं. २९६ येथे मौलाना अब्दुल कलाम स्मारकाच्या परिसरात हज हाऊस बांधणेसाठी र.रू. १ कोटीचे खालीलप्रमाणे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २०१६–१७ चे अंदाजपत्रक, १०.पथ, १०.क.पथ सुधारणा, पान क्र. १००, अ.क्र. २, शहरातील फुटपाथ विकसित करणे, (यादी क्र. ए–१३), पान क्र. १७९, बजेट कोड नं. सीई२०अे१०३/ए१३–१११, पुणे शहरामध्ये पादचाऱ्यांसाठी वर्दळ असणारे व अति महत्वाच्या रस्त्यावर पादचाऱ्यांसाठी उच्च दर्जाचे अडथळा विरहीत फुटपाथ व इतर अनुषंगिक कामे करणे | १ कोटी | --- |
| **<u>नविन सुचविलेले काम –</u>**<br>कोरेगांव पार्क फा.प्लॉट नं. २९६ येथे मौलाना अब्दुल कलाम स्मारकाच्या परिसरात हज हाऊस बांधणे | --- | १ कोटी |

(मा.मुख्य सभा मान्यता देईल या भरवशयावर मा.महा.आयुक्त यांनी सदर ठरावाची कार्यवाही करावी.)

**विषय क्रमांक :– ११३७ त्वर्य**

मा.रईस सुंडके, मा.अविनाश बागवे व मा.फारुक इनामदार यांचे दि.२४/८/२०१६ चे पत्र.

कोरेगांव पार्क फा.प्लॉट नं.२९६ येथे मौलाना अब्दुल कलाम स्मारकाच्या परिसरात हज हाऊस बांधणेचे काम ठेकेदार मे.सलीम कन्स्ट्रक्शन यांना मिळाले आहे. सदर ठिकाणी काम करणे शक्य नसल्याने कामाची जागा बदल करुन प्रभाग क्र.६३ अ कोंढवा खुर्द स.नं.४७/१/१, ४७/१/२ येथील ॲमिनिटी स्पेसच्या जागेमध्ये हज हाऊस बांधणेसाठी पूर्वी काढलेल्या टेंडर दरानुसार मे.सलीम कन्स्ट्रक्शन यांचेकडून काम करुन घेण्यास मान्यता देण्यात यावी.

**विषय क्रमांक :– ११३८ त्वर्य**

मा.राजेंद्र शिळीमकर व मा.श्रीकांत जगताप यांचे दि. २४/८/२०१६ चे पत्र.

सर्वे नं. १९ धनकवडी येथील ॲमिनिटी स्पेसच्या जागेवर विद्यार्थांसाठी हॉस्टेल उभारण्यास मान्यता देण्यात यावी.

**विषय क्रमांक :– ११३९ त्वर्य**

साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या जयंती निमित्त पुणे मनपाच्या वतीने दरवर्षी समाजात विविध क्षेत्रात काम करणाऱ्या एका व्यक्तीस पुरस्कार देवून सन्मानित करण्यास तसेच मुख्य पुरस्काराची रक्कम रुपये१,११,०००/- देण्यास व मा.महापौर यांचे अध्यक्षतेखाली मा.पक्षनेते यांची निवड समिती नियुक्त करणेस तसेच याबाबत मा.महापौर यांना अधिकार देण्यास मान्यता मिळणेबाबत मा.राजेंद्र शिळीमकर व मा.सुनिल कांबळे यांचे दिनांक २६/७/२०१६ चे पत्रावर झालेला मा.पक्षनेते सभेचा दि.६/८/२०१६ रोजी झालेला निर्णय विचारासाठी.

**विषय क्रमांक :– ११४० त्वर्य**

महात्मा ज्योतिबा फुले व क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या नावाने पुणे महानगरपालिकेचा पुरस्कार सुरू करणेसाठी सन २०१६–१७ च्या अंदाजपत्रकात पुरेशी तरतुद करण्यात आलेली असून मुख्य पुरस्काराची रक्कम रुपये१,११,०००/- देण्यास व मा.महापौर यांचे अध्यक्षतेखाली मा.पक्षनेते यांची निवड समिती नियुक्त करणेस तसेच याबाबत मा.महापौर यांना अधिकार देण्यास मान्यता मिळणेबाबत मा.सौ.अश्विनी कदम यांचे दिनांक ०२/०८/२०१६ चे पत्रावर झालेला मा.पक्षनेते सभेचा दि.६/८/२०१६ रोजी झालेला निर्णय विचारासाठी.

**विषय क्रमांक :– ११४१ त्वर्य**

भारतरत्न मदर तेरेसा यांनी राष्ट्रीय व अंतरराष्ट्रीय पातळीवर अत्यंत मोलाचे असे कार्य केले आहे. पुणे महानगरपालिकेच्या वतीने भारतरत्न मदर तेरेसा यांचे नावाने एका व्यक्तीस दरवर्षी पुरस्कार देणेसाठी पुणे महानगरपालिकेच्या अंदाजपत्रकात दर वर्षासाठी र.रु.तीन लाखाची (र.रुपये ३,००,०००/- ) ची तरतूद करणेस तसेच मुख्य पुरस्काराची रक्कम रुपये१,११,०००/- देण्यास व मा.महापौर यांचे अध्यक्षतेखाली मा.पक्षनेते यांची निवड समिती नियुक्त करणेस तसेच याबाबत मा.महापौर यांना अधिकार देण्यास मान्यता मिळणेबाबत मा.शंकर केमसे, सभागृह नेता, मा.बाळासाहेब बोडके, अध्यक्ष, स्थायी समिती, मा.अशोक हरणावळ व मा.डॉ.सिध्दार्थ धेंडे यांचे दिनांक ६/०८/२०१६ चे पत्रावर झालेला मा.पक्षनेते सभेचा दि.६/८/२०१६ रोजी झालेला निर्णय विचारासाठी.

**विषय क्रमांक :– ११४२ त्वर्य**

भारतीय स्वांतत्र्य दिनानिमित्त सोमवार, दिनांक १५ ऑगस्ट २०१६ रोजी सकाळी १०.३० वाजता पुणे महानगरपालिकेतर्फे पुणे शहरातील विविध क्षेत्रांतील नामवंत व्यक्तींचा सत्कार समारंभ श्री छत्रपती शिवाजी महाराज सभागृह, पुणे महानगरपालिका मुख्य भवन, शिवाजीनगर, पुणे ५ येथे आयोजित करण्यात आलेला होता.

संदर्भ क्र. १ च्या पत्रान्वये, पुणे शहरातील विविध क्षेत्रांतील नामवंत व्यक्तीचा सत्कार समारंभ कार्यक्रमप्रसंगी मे. काका हलवाई, टिळक रोड, पुणे यांचेकडून १० किलो कंदी पेढे मागविण्यात आले होते. त्याप्रित्यर्थ मे. काका हलवाई, टिळक रोड, पुणे यांनी रक्कम रूपये ४,४००/– चे बिल सादर केले आहे .

तरी मे. काका हलवाई, टिळक रोड, पुणे यांनी पुरविलेल्या १० किलो कंदी पेढयांचे प्रति किलो ४४० या दराने एकूण रक्कम रूपये ४,४००/– चे बिल खालील अर्थशिर्षकावर खर्ची टाकणेस व बिलाची रक्कम संबंधितास अदा करणेस पश्चात मान्यता मिळणेबाबत मा.नगरसचिव यांचे जा.क्र. ३०८२ दि. २४/८/२०१६ चे पत्र.

सन २०१६ – २०१७ चे अंदाजपत्रक, १. मुख्य देखरेख वसुली वगैरे, क. महानगरपालिका व स्थायी समिती, १. नगरसचिव यांचे कार्यालय, ३. संकिर्ण (न.स.), बजेट कोड RE11A103, सन २०१६ – २०१७ मान्य तरतूद रक्कम रूपये ७५,००,०००/–, ( अक्षरी रक्कम रूपये पंच्याहत्तर लाख रूपये फक्त )

**विषय क्रमांक :– ११४३ त्वर्य**

मा.सौ.सुमन पठारे, मा.फारुक इनामदार, मा.सुनिल गोगले व मा.सौ.सुनंदा गलांडे यांचे दि.२४/८/२०१६ चे पत्र.

खराडी येथील स.नं. १०, ११ व स.नं.३९, ४२ येथील डी.पी. रस्त्यावर १८ इंची डी.आय. लाईन टाकणेसाठी र.रू. ७५ लाखाचे खालीलप्रमाणे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २०१६–२०१७ चे अंदाजपत्रक, १०.पथ, १०.क.पथ सुधारणा, पान क्र. १००, अ.क्र. २, शहरामधील फुटपाथ विकसित करणे, (यादी क्र. एसए १३), पान क्र.१७९, पुणे शहरामध्ये पादच्यांसाठी वर्दळ असणारे व अतिमहत्वाचा रस्त्यांवर पदचाऱ्यांसाठी उच्च दर्ज्याचे अडथळा विरहित फुटपाथ व इतर अनुषंगिक कामे करणे (बजेट कोड– CE20A103/A13-111) | ७५ लाख | --- |
| **<u>नवीन सुचविलेले काम</u>**<br>खराडी येथील स.नं. १०,११ व स.नं.३९,४२ येथील डी.पी. रस्त्यावर १८ इंची डी.आय. लाईन टाकणे. | --- | ७५ लाख |

मा.मुख्य सभा मान्यता देईल या भरवशावर मा.महापालिका आयुक्त यांनी सदर ठरावाची कार्यवाही करावी.

**विषय क्रमांक :– ११४४ त्वर्य**

नगर रोड (वडगावशेरी) क्षेत्रिय कार्यालयांतर्गत झाडणकामासाठी मजूर पुरविणे (भाग–३) कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ३ टेंडर्सपैकी ठेकेदार मे.राहुल सर्व्हिसेस यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु.४९,९९,५१९=७० पेक्षा ९.९९% जास्त) (सुधारित) असल्याने त्यांचेकडून र.रु.५४,९८,९७१=७१ रकमेपर्यंत दि. २३/६/२०१६ पासून काम करुन घेणेस त्यापोटी त्यांचेशी करारनामा करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे जा.क्र. मआ/उआ प–२/४५९ दि. २४/८/२०१६ चे पत्र.

**विषय क्रमांक :– ११४५ त्वर्य**

नगर रोड (वडगावशेरी) क्षेत्रिय कार्यालयांतर्गत झाडणकामासाठी मजूर पुरविणे (भाग–२) कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ३ टेंडर्सपैकी ठेकेदार मे.श्री गणेश एंटरप्रायजेस यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु.४९,९९,५१९=७० पेक्षा ९.९९% जास्त) (सुधारित) असल्याने त्यांचेकडून र.रु.५४,९८,९७१=७१ रकमेपर्यंत दि. २३/६/२०१६ पासून काम करुन घेणेस व त्यापोटी त्यांचेशी करारनामा करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे जा.क्र. मआ/उआ प–२/४६० दि. २४/८/२०१६ चे पत्र.

**सुनिल पारखी**
**नगरसचिव,**
**पुणे महानगरपालिका.**